# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{ प्रकल्प विभाग - १ }**

वर्धा रोड वरील फ्लायओव्हर व मेट्रो रेल यांचेसाठी महा.मेट्रो रेल कॉर्पोरेशन मर्या. यांनी बांधलेल्या डबल डेकर पूला मधून मनिष नगर कडे जाणारा दोन पदरी फ्लॉयओव्हरचा भाग (Manish Nagar ROB) तसेच रेल्वे ट्रक खालून बांधण्यात आलेला दोन पदरी अंडरपास (RUB) महानगरपालिका, नागपूर यांचेकडे महा.मेट्रो रेल कॉर्पोरेशन मर्या. यांचेकडून हस्तांतरीत करुन घेणे साठीचा हस्तांतरण प्रस्ताव साक्षांकित करणे बाबतचा प्रश्न विचारात घेणेबाबत.

**टिप** :–

१. महा.मेट्रो रेल कॉर्पो. मर्या. यांनी बांधलेल्या वर्धा रोड वरील डबल डेकर फ्लाय ओव्हर मधून मनिषनगर कडे जाणारा फ्लायओव्हरचा भाग (ROB) तसेच रेल्वे ट्रॅक खालून बांधण्यात आलेला अंडरपास (RUB), मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांनी हस्तांतरीत करुन घेणेबाबत दि. २० ऑगस्ट,२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये अनुमती दिलेली आहे.
२. विस्तृत टिप्पणी व हस्तांतरण टिप्पणी मुळ प्रती (Handing Over Receipt) नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 49/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 01/10/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प - १), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार वर्धा रोड वरील फ्लायओव्हर व मेट्रो रेल यांचेसाठी महा.मेट्रो रेल कॉर्पोरेशन मर्या. यांनी बांधलेल्या डबल डेकर पूला मधून मनिष नगर कडे जाणारा दोन पदरी फ्लॉयओव्हरचा भाग (Manish Nagar ROB) तसेच रेल्वे ट्रक खालून बांधण्यात आलेला दोन पदरी अंडरपास (RUB) महानगरपालिका, नागपूर यांचेकडे महा.मेट्रो रेल कॉर्पोरेशन मर्या. यांचेकडून हस्तांतरीत करुन घेणे साठीचा हस्तांतरण प्रस्ताव साक्षांकित करणे बाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुी प्रदान केली.